**Publication:** TarunDarpan Warta
**Date:** 05.09.2015
**Page:**04
**Headline:**S.F.S Junior College wins TCS IT Wiz 2015’s Nagpur Edition

### एसएफएस ज्युनियर कॉलेज, सेमिनरी हील्स ने जिंकली

# टीसीएस आयटी विझ 2015ची नागपूर फेरी

**नागपूर:** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या आघाडीच्या आयटी सेवा, कन्सल्टिंग आणि व्यवसायासंदर्भातले तोडगे पुरवणा-या कंपनीतर्फे भरवल्या जाणा-या टीसीएस आयटी विझ, या भारतातल्या सर्वात मोठ्या आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये नागपूरच्या विविध शाळांमधले विद्यार्थी सहभागी झाले. शुक्रवार 4 सप्टेंबर रोजी सिव्हिल लाइन्स इथल्या एमएलए हॉस्टेलसमोरच्या डॉ. वसंतराव देशपांडे हॉलमध्ये ही स्पर्धा पार पडली. कोणतंही प्रवेश शुल्क नसणारी ही स्पर्धा 8 वी ते 12 वीपर्यंतच्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी खुली होती. प्रादेशिक फायनल राऊण्डसमधल्या 5 फे-यांमधल्या प्रश्नांची अचूक उत्तरं दिल्यानंतर या विद्यार्थ्यांनी हा किताब जिंकला. प्रादेशिक फे-यांमधल्या प्रत्येक विजेत्याला यावर्षी आयपॅड एअर मिळाला हे विद्यार्थी रनर-अप ठरले ज्यांना खास डिझाइन करण्यात आलेल्या ट्रॉफी आणि मेडल्ससह आयपॅड मिनी मिळाला. प्राथमिक लेखी फेरीनंतर प्रादेशिक अंतिम फेरीत प्रवेश मिळवलेल्या सहा स्पर्धकांना टीसीएसकडून भरपूर बक्षिसं मिळाली ज्यात लॅपटॉप बॅग्ज, हेडफोन, ब्ल्यूटूथसह सेल्फी स्टिक्स, सिपर आणि यूएसबी पेन ड्राइव्ह यांचा समावेश होता. या फेरीचे प्रमुख पाहुणे टीसीएसच्या इंटर्नल आयटी ॲण्ड शेअर्ड सर्व्हिसेस विभागाचे व्हाइस प्रेसिडण्ट आणि ग्लोबल हेड श्री. आलोक कुमार यांनी विजेत्यांना पारितोषिकं प्रदान केली. टीसीएस आयटी विझ 2015 ही भारतातल्या पुढील 15 ठिकाणी भरवली जाते, अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदूर, कोची, कोलकाता, लखनउ, मुंबई, नागपूर, पुणे आणि विशाखापट्टनम. यावर्षीपासून आयटी क्विझ प्रथमच विशाखापट्टनम इथे भरणार आहे.




**ही शाळा मुंबईत होणा-या राष्ट्रीय अंतिम फेरीत करणार नागपूरचं प्रतिनिधित्व**